# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत सार्वजनिक आरोग्य खात्याच्या आस्थापनेवरील मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली रिक्त पदे भरण्यासाठी खाली नमूद केलेल्या अर्हता धारण करणा-या व अटींची पुर्तता करणा-या इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज पाठविण्याचा पत्ता:- कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय, 3 रा मजला, एफ/दक्षिण विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई-400012

अर्ज सादर करण्याची तारीख- दि.16.03.2020 ते दि.31.03.2020 या कालावधीत सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 या कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**संवर्ग- मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ**
**वेतनश्रेणी-रु.35400-112400 अधिक अनुज्ञेय भत्ते**
**समांतर आरक्षण**

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्युएस | एकूण मावक | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |

**<u>पदाचे नाव:- मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ.</u>**

**पदांची कर्तव्ये:-**

1) वॉर्ड तसेच ओपीडी मधील रुग्णांचे ई.ई.जी. काढणे
2) काढलेल्या ई.ई.जी. चा रेकॉर्ड ठेवणे.
3) वरिष्ठांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे.

**शैक्षणिक अर्हता:-**

- उमेदवार बारावीनंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा न्युरोटेक्नोलॉजी (Neurotechnology) विषयातील बी.पी.एम.टी. ( Bachelor in paramedical technology in Neurotechnology ) 31/2 वर्षाचा पुर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा. किंवा
- उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील पदवी पदार्थ विज्ञान (फिजीक्स) (B.sc in physics) पदवी परिक्षा उत्तीर्ण असावा. ज्या ई.ई.जी. केंद्रामध्ये वर्षभरात कमीत कमी 500 EEG चाचण्या केल्या जातात अशा केंद्रामध्ये काम केल्याचा 6 महिन्याचा अनुभव असावा.
- उमेदवारास महापालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- उमेदवारांस ''डी.ओ.ई., ए.सी.सी. सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी / वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने /तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी.ची परिक्षा नेमणुकीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.
- उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- वयोमर्यादा- खुल्या प्रवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे वय दि.01.01.2020 रोजी 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. मागास प्रवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे वय 43 वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.
- अगोदरच मुंबई महानगरपालिका सेवेत असल्यास उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा नाही.

**निवडीचे निकष:-**

- मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ या पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार न्युरोटेक्नोलॉजी (Neurotechnology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in paramedical technology in Neurotechnology)पदवी परिक्षेच्या किंवा विज्ञान शाखेतील पदार्थ विज्ञान(B.Sc in physics) पदवी परिक्षेच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची व्यवसाय चाचणीकरीता निवड यादी तयार करण्यात येईल. व्यवसाय चाचणी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल व अंतिम निवड यादी प्रस्तृत करण्यात येईल.
- उमेदवाराने पदवी दुस-या व तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास पदवी परीक्षेत मिळविलेल्या अंतिम गुणांमधून अनुक्रमे 1 व 2 टक्के गुण वजा केले जातील.
- अंतिम पदवी तीनपेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ पदासाठी विचार केला जाणार नाही.
- पदवी परीक्षेत समान टक्केवारी असेल तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या तारखांनुसार प्राधान्य देण्यात येईल.
- समान गुण धारण करणा-या उमेदवारांना जन्म तारखेनुसार वयोज्येष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल.

**निवडीची कार्यपद्धती:-**

1. उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल. मागास प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरीता अर्ज करण्याची मुभा राहील.
2. खुल्या प्रवर्गाच्या पदांसाठी निवड झालेली असेल अशा उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गाच्या उमेदवारांची खुल्या प्रवर्गात नेमणूक करण्यात येईल.
3. अर्जाची पडताळणी करून ज्या उमेवारांची कागदपत्रे योग्य व परिपूर्ण असतील अशा उमेदवारांची व्यवसाय चाचणी घेण्याकरीता नावे, दिनांक व वेळ स्थानिक सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.
4. भरती प्रक्रीया पूर्ण झाल्यावर सामाईक गुणवत्ता यादी (Combined Merit List) प्रस्तृत करण्यात येईल.

**खालीलप्रमाणे प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.**

**अ) शैक्षणिक अर्हता - एकुण गुण – 40**

| अ.क्र. | या पदाकरीता आवश्यक टक्केवारी | खुला प्रवर्गा करिता | एकुण गुण 40 |
|---|---|---|---|
| 1 | उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा न्युरोटेक्नोलॉजी (Neurotechnology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in paramedical technology in Neurotechnology) 3 ½ वर्षांचा पुर्णवेळ पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परिक्षेतील एकूण गुण | 50% किंवा अधिक | 20 |
| | | 60% किंवा अधिक | अतिरिक्त 10 गुण |
| | | 70% किंवा अधिक | अतिरिक्त 10 गुण |
| 2 | उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील पदार्थ विज्ञान (B.Sc in physics) पदवी परिक्षा उत्तीर्ण असावा. ज्या ईईजी केंद्रामध्ये वर्षभरात कमीत कमी 500 EEG चाचण्या केल्या जातात अशा त्या केंद्रामध्ये काम केल्याचा 6 महिन्यांचा अनुभव असावा. | 50% किंवा अधिक | 20 |
| | | 60% किंवा अधिक | अतिरिक्त 10 गुण |
| | | 70% किंवा अधिक | अतिरिक्त 10 गुण |

**ब) अनुभव - एकुण गुण – 20**

1. या क्षेत्रात काम करण्याचा 5 वर्षाचा अनुभव - 5 गुण
2. 5 वर्षापेक्षा अधिक अनुभवासाठी अतिरिक्त - 5 गुण
3. Intra oprative EEG, ECOG monitoring काम केल्याचा अनुभव - 5 गुण
4. अर्जदार Epilepsy, surgery unit मध्ये प्रशिक्षण घेतलेले असल्यास किंवा Botox Injection देण्याचा अनुभव असल्यास - 5 गुण

(उपरोक्त सर्व अनुभवांबाबत प्रमाणपत्र आवश्यक आहे.)

**क) व्यवसाय चाचणी - एकुण गुण – 40**

उमेदवाराने अर्जासह सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्राच्या आधारे शैक्षणिक अर्हतेचे 40 गुण व अनुभवाचे 20 गुण अशा एकूण 60 गुणांपैकी उमेदवारास मिळालेल्या एकूण गुणांप्रमाणे उच्च गुणवत्ता धारक पात्र उमेदवारांची व्यवसाय चाचणी घेण्यात येईल.

शैक्षणिक अर्हतेचे 40 गुण अधिक अनुभवाचे 20 गुण अधिक व्यवसाय चाचणीचे 40 गुण अशा एकूण 100 गुणांपैकी उमेदवाराने मिळवलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

व्यवसाय चाचणी घेण्याकरिता नावे, दिनांक व वेळ स्थानिक सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

उपरोक्त बाबतीत आवश्यकता भासल्यास आवश्यक ते बदल प्रशासनाकडून करण्यात येतील. आवश्यक असल्यास भरती प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून कधीही थांबविली किंवा पुढे ढकलली जाऊ शकते.

**सर्वसाधारण अटी:-**

1.रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अधिकार मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहे.

2.जाहिरातींमध्ये दिलेल्या पदाची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.

3.अर्ज/वैयक्तिक माहितीपत्र(Bio data) विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावे. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण वैयक्तिक माहितीपत्र विचारात घेतले जाणार नाहीत.

4.अगोदरच बृहन्मुंबई महापालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-यांला वर नमूद केलेल्या पदाकरिता अर्ज करावयाचा असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खातेप्रमुखाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

5.अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रकियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

6. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणा-या) ए-4 आकारातील असावे.

7. उमेदवारांनी स्वत:निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

**8.पत्रव्यहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.**

9. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागसवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.

10.उमेदवारांनी जन्म दाखला/अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे,शाळा सोडल्याचा दाखला, व्यावसायिक अर्हता,संबंधित गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमी लेअर प्रमाण, यांच्या मूळप्रती व साक्षांकित छायांकित प्रतींसह उपस्थित रहावे. तसेच सदर प्रमाणपत्रांच्या छायांकित/साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. विवाहित महिला उमेदवारंनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावांत बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहपूर्वीच्या नावांने अर्ज करु शकतात. **उमेदवार एका पेक्षा अधिक प्रयत्नात अंतिम वर्षाची पदवी परिक्षा उत्तीर्ण झाला असल्यास सर्व प्रयत्नांच्या गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्या उमेदवाराचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.**

11.उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास /शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

12.निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या एक महिन्यांच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे(आशयाचे) बंधपत्र **(Surety Bond)** सादर करावे लागेल. सदर अनामत रक्कम भरुन सुध्दा मनपामध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना भरलेली अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

13.टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहीत मुदतीत अर्ज स्विकारण्याच्या ठिकाणी प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

14.पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

15.रिक्त पदांच्या तुलनेत जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेतील गुणवत्तेनुसार कपात यादी तयार करण्यात येऊन, त्यानुसार उमेदवारांना व्यवसाय चाचणी परिक्षेस बोलविण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

16. उमेदवारांना व्यवसाय चाचणी परिक्षेसाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

17.निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही रुग्णालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही रुग्णालयात बदली योग्य असेल.

18.निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

19.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

20.निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होतील. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू होईल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम (1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू होणार नाही.

21.सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

22.निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती केली जाईल.

23. निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी मनपा वैद्यकीय परिक्षक यांच्यामार्फत करण्यात येईल. व त्यांनी नोकरीस पात्र ठरविल्यानंतरच त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

24. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची रहाणार नाही.

25. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र असावे.

26. शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित पडताळणी समितीकडून करून घेणे बंधनकारक आहे. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

27. निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नविन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्ही पैकी जे आधी घडेल त्या दिनांका पर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**अर्ज सादर करण्याची पध्दत:-**

पात्रता निकषांची पुर्तता करणा-या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतींसह जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी टपालाद्वारे किंवा वैयक्तिकरित्या पाठविणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

**विशेष सुचना:-**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/ प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यांदीचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

3. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती, यांचा गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

4. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविणयाचे अधिकार मुंबई महापालिका आयुक्त, यांना आहेत.

5. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार वैयक्तिक माहितीपत्रासह आणि आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ व साक्षांकित प्रतीसह हजर राहणे आवश्यक आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **सही /-** | **सही /-** | **सही /-** | **सही /-** | **सही /-** |
| **कार्यकारी आरोग्य अधिकारी** | **प्रमुख कर्मचारी अधिकारी** | **उपायुक्त(सा.आ)** | **सह आयुक्त(सा.प्र.)** | **अति.आ.(प उप)** |

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी 2.5 से.मी X 3 से.मी.

**पदाचे नावः- मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ (ई.ई.जी.तंत्रज्ञ)**

प्रति,
कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय,
3 रा मजला, एफ/दक्षिण विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई-400012

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामध्ये वर नमूद केलेल्या पदाकरीता दि...............च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

1. (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) मराठीत ---------------------------------------------
   (ब) वडीलांचे/पतीचे संपूर्ण नाव ---------------------------------------------
   (क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता) ---------------------------------------------
2. अ) पत्ता (पोस्टल पिनकोडसह) ------------------------------------------
   -------------------------------------------
   -------------------------------------------
   ब) दुरध्वनी क्रमांक (एसटीडी क्रमांकासह) [ ] भ्रमणध्वनी [ ]
   क) ई-मेल आयडी: [ ]
3. लिंग:पुरुष [ ] स्त्री: [ ]
4. जात: -------------------पोट जात:------------------- प्रवर्ग -------------------
5. अ) जन्मदिनांक: दिनांक-------महिना------वर्षे
   ब) दि.-------- रोजी असलेले वय --------------वर्षे ------------महिने------------- दिवस
6. शैक्षणिक अर्हता:

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | शालांत परीक्षेतील गुण | | उत्तीर्णतेचे प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| 1 | 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा बी.पी.एम.टी. (Bachelor in paramedical technology in Neurotechnology) न्युरोटेक्नोलॉजी (Neurotechnology) या विषयातील पुर्णवेळ पदवी अभ्यासक्रम | | | | | | | |
| 2 | बी.एस.सी. (Physics)पदवी (All Semesters) | | | | | | | |

बी.एस.स्सी.पदवी (B.Sc. In Physics) पदवी परीक्षेच्या सर्व गुणपत्रिका तसेच Attempt Certificate जोडणे आवश्यक आहे.

7. संगणकविषायक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे/नाही (प्रमाणपत्र सोबत जोडावे)
8. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम उच्चतम परिक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण आहे: आहे/नाही(प्रमाणपत्र सोबत जोडावे)

९. अनुभव:

अ) ई.ई.जी. तंत्रज्ञ या क्षेत्रात काम करण्याचा अनुभव किती वर्षे ------------------(प्रमाणपत्र सोबत जोडावे)

ब) Intra oprative EEG,ECOG Monitoring काम केल्याचा अनुभव आहे का ----------(प्रमाणपत्र सोबत जोडावे)

क) Epilepsy, Surgery unit मध्ये प्रशिक्षण घेतले असल्यास किंवा Botox Injection देण्याचा अनुभव आहे का-----(प्रमाणपत्र सोबत जोडावे)

10. स्थानिक पोलीस ठाण्याचा संपूर्ण पत्ता ------------- - ------------------------

--------------------------------------

11. अ) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही , असल्यास त्याबाबतचा तपशिल:------------------------

ब) असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन सध्याच्या नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडावे-----------------

12. अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? होय/नाही.

ब) शिक्षा झाली असल्यास त्यांचा तपशिल नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

13. उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कर्मचारी आहे का- होय/नाही

अ) उमेदवारा विरुध्द खात्यांतर्गत चौकशी प्रलंबित वा प्रस्तावित आहे का- होय/नाही

ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा.

क) कर्मचारी महानगरपालिकेच्या सेवानिवासस्थानात राहत आहे का: (राहत असल्यास विनाभाडे किंवा सवलतभाडे तपशील देणे तसेच सेवा निवासस्थानाचा पुर्ण पत्ता द्यावा)

मी या अर्जान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणिवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी--------------------------पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपलिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

दिनांक-
ठिकाण-

आपला/ आपली विश्वासू

(अर्जदाराची सही व नाव)

सोबत-1)
2)
3)
4)